● रविवार, दि. २२ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १४४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालनेकरांच्या हित व विकासासाठी तसुभरही मागे हटणार नाही - आमदार अर्जुनराव खोतकर

## मनपा सभागृहात सर्वपक्षीय, व्यापारी व नागरिकांची जम्बो बैठक; चार तासांपेक्षा अधिक काळ जालन्यातील समस्यांवर चर्चा




**दीपक शेळके**

**जालना** - जनतेच्या हितासाठी, शहराच्या सौंर्दयकरणासह विकासासाठी शासकीय स्तरावरुन मदत मिळविण्यासाठी तसुभरही मागे हटणार नसल्याचे आश्वासन नवनिर्वाचित आमदार अर्जुनराव खोतकर यांनी येथे दिले. शनिवार (दि.२१) रोजी जालना शहर महानगर पालिकेच्या सभागृहात सर्वपक्षिय, व्यापारी व नागरिकांच्या आयोजित बैठकीत बोलत होते. शहरातील पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने आयोजित या बैठकीत शहरातील रस्ते, स्वच्छता, भटके कुत्रे-जनावरे, उघड्यावरील मांस विक्री, अतिक्रमणे, महात्मा फुले मार्केट, अण्णाभाऊ साठे मार्केट, ओपन स्पेस, स्मशानभुमि, उद्याने, टॅक्स, जीएसटी आदी सर्वच समस्यांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, राजेश राऊत, शाह आलम खान, विष्णु पाचफुले, अशोक पांगारकर, राहुल हिवराळे, राजेंद्र जाधव, अनिरुद्ध खोतकर, अ‍ॅड. सुनील किनगावकर, अ‍ॅड. भास्कर मगरे, राजेंद्र राख, पंडीत भुतेकर, रवी राऊत, मिर्झा अनवर बेग, सौ. संध्याताई देठे, दिनकर घेवंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी उपस्थित सर्वपक्षिय नेते-व्यापारी-नागरिकांनी जालन्यातील विविध समस्यांकडे अर्जुनराव खोतकर यांचे लक्ष वेधले.

त्याला उत्तर देतांना आमदार खोतकर म्हणाले की, सर्वांनी अभ्यासपूर्ण सुचना व सुंदर शहराची कल्पना मांडली आहे. हे केवळ कागदावर न ठेवता आपल्या सर्वांच्या मदतीने व साथीने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कसोसीने प्रयत्न आपण करु. आयुक्तांनी दिलेला आकृतीबंध हा मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्याची मान्यता मिळवून घेण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करु. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्याशी आपले जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शहराच्या विकासासाठी राजकीय वजन वापरून कामे करुन घेण्याचा आपला प्रयत्न राहील. मृतप्राय खाालेले अस्तित्त्व निर्माण करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. लोकांना दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी वेळप्रसंगी सरकारशी लढावे लागले तर आपण नक्कीच लढणार असल्याचा शब्दही यावेळी आ. खोतकर यांनी उपस्थितांना दिला.

टॉप टू बॉटम पाण्यावर चर्चा झाली. जालनेकरांना एक दिवसाआड पाणी देण्याचा मी निवडणुकीपुर्वी शब्द दिला होता. टप्प्या-टप्प्याने पाणी पुरवठ्याचा कालावधी कमी करत करत म्हणजेच येत्या दोन-तीन महिन्यात चार दिवसाआड पाणी देण्याचा नंतर तीन दिवसाआड, त्यानंतर दोन दिवसाआड असे वर्षभराच्या आत एक दिवसाआड पाणी जालनेकरांना मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणार आहे. तसे प्रयत्न सुरु देखील आहे. जालन्याला ६० एमएलडी पाणी पुरवठा करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. ३५ एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर आहेत जवळपास ४० टक्के काम पुर्ण झाले असून येत्या सहा-सात महिन्यात हे काम १०० टक्के पूर्ण होईल. त्यानंतर जालनेकरांना किमान एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जाईल. शहराचा विस्तार होत आहे. तसेच लोकसंख्या वाढत चालली आहे. भविष्यात घाणेवाडी जलाशय व जायकवाडी- जालना या दोन्ही प्रकल्पातून येत असलेले पाणी कमी पडणार आहे. हा विषय पुढील आठ-दहा वर्षांनंतर उद्‌भवू शकतो त्यासाठी हातवण हा महत्त्वाचा स्त्रोत आहे. या प्रकल्पातून शेतकऱ्यांना पाणी दिल्या जाते. शेतकऱ्यांचे पाणी शेतकऱ्यांना पूर्ण मिळेल. या हातवण प्रकल्पाची क्षमता वाढवू आणि वाढलेल्या क्षमतेनंतरच आपण त्याचा विचार जालन्यातील पाणी पुरवठ्यासाठी करु असे म्हणून शेतकऱ्यांनी कुठलीही शंका मनात आणू नये व शेतकऱ्यांची पाणी घेणार अशा काही अफवा इतरांनी पसरवू नये असे आवाहन देखील यावेळी मिडीयासह उपस्थितांना केले. क्षमता वाढविल्याशिवाय हातवण प्रकल्पातून पाणी घेणार नसल्याचा पूर्नउच्चार देखील यावेळी आ. खोतकर यांनी केला. जायकवाडी जालना पाणी पुरवठ्यासाठी लागणाऱ्या वीज बिलामुळे मनपावर आर्थिक भार वाढत असल्याने सोलार पॅनलची पान २ वर

### महापालिकेने महत्वाच्या भूखंडाकडे लक्ष द्यावे- राजेश राऊत

जालना महापालिकेचे अनेक भूखंड हे महत्वाच्या जागांवर आहेत. शहरातील मध्यवस्तीत असलेल्या मालमत्तांचे संरक्षण करणे गरजेचे असून मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह आणि महात्मा फुले मार्केटची उभारणी गतीने व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करून ज्या कंत्राटदाराने शहरातील अंतर्गत जलवाहिनीचे काम केले आहे त्याची हायड्रोलिक चाचणी न घेताच बिल अदा केल्याबद्दल राऊत यांनी नाराजी व्यक्त केली. रस्त्यांच्या मधोमध वीजेचे खांब आलेले आहेत. रस्त्याचा गुणवत्ता दिसत नाही, शासन ऐवढा निधी देतो, आता एकनाथ शिंदे यांनी जालन्याला १००० कोटी देण्याचे आश्वासन दिले होते. जर हे हजार कोटी आले तर कामात गुणवत्ता ठेवून कामे झाली पाहिजे अशी अपेक्षाही यावेळी श्री राऊत यांनी व्यक्त केली. उघड्यावरील मांस विक्री बंद करण्यात यावी, खेळाच्या मैदानावर कुठलीही सुविधा नाही, शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. गोरगरीब-सर्वसामान्यांच्या मुलांसाठी दर्जेदार शिक्षण मिळायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली. महात्मा फुले मार्केटची उभारणी आपल्या कार्यकाळात व्हावी अशी अपेक्षा श्री राऊत यांनी व्यक्त करताच आ. खोतकर श्री राऊत यांना मध्येच थांबवून कार्यकाळात नव्हे काही वेळ सांगा असे आवाहन करतांनाच येत्या दोन वर्षात महात्मा फुले मार्केटची उभारणी करू असे आश्वासन आ. खोतकर यांनी लागलीच दिले.

(पान २ वर...)

**मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा- संध्या देठे**

**ठोस निर्णय घ्यावेत - राजेंद्र राख**

**अल्पसंख्यांकासाठी दिलेल्या निधीबद्दल मानले खोतकरांचे आभार- शाह आलम खान**

**जवाहर बाग खुले करा - विष्णु पाचफुले**

**वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पाण्याचे स्त्रोत वाढवावे - राजेंद्र जाधव**

**गौतम बौद्ध मुर्तीचे काम लवकर करावे - रवी राऊत**

**मुख्य पाईपलाईनमधून पाणी घेणाऱ्यांवर कारवाई करा- मिर्झा अनवर बेग**



### मोतीतलाव परिसरात १३० कोटींचे भव्य पार्क

उद्यान सुशोभिकरणासह गौतम बौद्ध यांचा पुतळा मोती तलावात बसविण्यात येणार आहे. यासह येथे मोठे पार्क होणार असून त्या ठिकाणी ध्यान केंद्र, विपशना केंद्र, कारंजे, घाट अशा राज्यातील सुंदर पार्क २० एकर जमिनीवर साकारणार आहोत. यासाठी १३० कोटीं रुपये मंजूर करण्यात आले असल्याची माहितीही यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

### राज्य आणि केंद्र सरकारचा निधी आणावा - भास्कर अंबेकर

जालना शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रथम अतिक्रमणे हटविणे गरजेचे असून ती श्रीमंताची असो की गरिबांची असा भेद न धरता प्रशासनाने कारवाई करावी, शहर विकासासाठी नेमके काय केले पाहिजे, याचा विकास आराखडा दहा वर्षापूर्वीच मंजूर आहे. त्या ३५० आरक्षणांपैकी पालिकेने केवळ दोन आरक्षणे विकसित केली आहेत. असे सांगून पाणीपुरवठा, स्वच्छता सुरळीत रहावी, यासाठी पालिकेकडे असलेला अपूरा कर्मचारीवर्ग ही देखील एक गंभीर बाब आहे. त्यामुळे पालिकेने नेमका त्यांना किती कर्मचारीवर्ग हवा आहे याचा प्रस्ताव तयार करून तो पाठवावा, असे सांगून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना आहेत, त्यातून काही कोटी रूपये हे शहर विकासासाठी मिळू शकतात, परंतु त्यासाठी अभ्यासपूर्ण आणि तांत्रिक दृष्ट्या सक्षम असलेल्या प्रस्तावांची निर्मिती करून त्या-त्या विभागाकडे सादर करण्याची गरज अंबेकरांनी व्यक्त केली. याबाबत त्यांनी नाशिक महापालिका आणि धुळे शहराचे उदाहरण दिले. मनपात पॅरेलर व्यवस्था निर्माण झालेली आहे. नळ कनेक्शन असो अथवा बांधकाम परवाना यासाठी स्वच्छता निरीक्षक व पाणी पुरवठ्याचे कर्मचाऱ्यांना मॅनेज केल्यास काम होते. त्यामुळे नागरिक मनपात येत नाही याकडेही श्री अंबेकर यांनी लक्ष वेधले.

# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करा - गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी** - परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या आंदोलकाच्या मृत्यू प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मा.आमदार कैलास गोरंटयाल यांनी आज शनिवारी येथे बोलतांना केली आहे. परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी या आंदोलकाचा झालेला मृत्यू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेचा निषेधार्थ आंबेडकरी संघटनांच्या वतीने आज शनिवारी जालना शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते.यावेळी शांतता रॅलीत सहभागी होत माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी उपरोक्त मागणी केली आहे. यावेळी ते म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी याच्या हत्येप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांना केवळ निलंबित करून चालणार नाही तर त्या पोलीस अधिकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा तसेच मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्यात यावी अशी मागणी करत जालना बंदला प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले.



# फळबाग पिक विम्यांची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ द्या, ‘ज्ञानराधा’च्या ठेवी परत करा

## आ. नारायणराव कुचे यांची विधानसभेत मागणी

**जालना । प्रतीनिधी** - जालना जिल्ह्यातील फळबाग पिक विमाची रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ अदा करुन ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेच्या ठेवीदाराला ठेवी तात्काळ ठेवीदारांना तात्काळ देण्याची मागणी बदनापूर-अंबड विधानसभा मतदार संघाचे आ.नारायणराव कुचे यांनी नागपुर येथील हिवाळी अधिवेशनाच्या औचीत्याचा मुद्यावरुन विधानसभा अध्यक्षाकडे केली. यावेळी नागपुर येथील हिवाळी अधिवेशनात आ. कुचे म्हणाले की, जालना जिल्ह्यातील शेतकऱ्याचे फळबागाचे, व झाडाचे व पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे परंतु पिक विमा कंपनीने काही निवडक शेतकऱ्यांनाच पिकविमा दिला असून उर्वरीत



काही शेतकऱ्यांना अद्याप पिकविमा कंपनीने दिलेला नाही तरी राज्यशासनाने याबाबत पिक विमा पान २ वर

## संपादकीय पान

# चटका लावून जाणारी निवृत्ती

धोकेदायक ऊस वाहतूकीला शिस्त लावा

उसाच्या ट्रॅक्टर ला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. मागील वर्षी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजतील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# दिल्लीतील परेडसाठी निखिल चव्हाणची निवड

**मुंबई -** सि एच एम महाविद्यालय (उल्हासनगर) या महाविद्यालयाला बहुमान मिळाला. प्रत्येक राज्यातून ठराविक विद्यार्थ्यांची होते निवड.

सि एच एम महाविद्यालय उल्हासनगर (जिल्हा ठाणे) राष्ट्रीय छात्रसेना विभागाअंतर्गत एन सी सी ट्रेनिंग घेत आहे. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताकदिनी दिल्ली राजपथावर होणाऱ्या (रिपब्लिक डे कॅम्प) परेडसाठी निवड झाली आहे. दिल्लीत प्रजासत्ताकदिनी प्रत्येक राज्याचे रथ व वेगवेगळ्या राज्याचा नृत्यविष्कार सादर केला जातो. भारतातील आर्मी, नेव्ही, एअर फोर्स जवानांचे संचलन होते. त्याबरोबरच प्रत्तेक राज्यातून काही एन सी सी कॅडेट निवडले जातात. यावेळीही देशातील प्रत्तेक राज्यातून ठराविक एन सी सी कॅडेटची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून ठाणे जिल्ह्यातील वांगणी येथील निखिल विशाल चव्हाण याची निवड झाली.

निखिल हा सद्या एन सी सी च्या तिसऱ्या वर्षात आहे. तसेच बटालियन मार्फत त्याचे सिलेक्शन झाले आहे. सलग तीन महिने दहा- दहा दिवसाचे कॅम्प आर्मीकडून आयोजित केली जातात. त्या प्रत्तेक कॅम्पमध्ये त्याचे सिलेक्शन झाले आहे.

दिल्ली साठी सिलेक्शन होणे अत्यंत कठीण बाब आहे. सर्व अडथळे पार करून निखिल याने ही मजल मारली आहे. त्याचे एकच स्वप्न होते ते म्हणजे या विभागातून दिल्लीला परेडसाठी जाणे आणि ते स्वप्न निखिलने पूर्ण करून दाखवले.

# माणगांव तालुक्यात पदवीधरांकरिता शासकीय नोकरभरती व स्पर्धा परीक्षेकरीता सुसज्ज अभ्यासिका व्हावी

## भाजपा युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांचे आमदार निरंजन डावखरेंना साकडे

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** माणगांव शहरामध्ये पदव्युत्तर व स्पर्धा परीक्षा/ शासकीय नोकरभरती करीता सुसज्ज अभ्यासिका केंद्र व्हावे अशी मागणी भाजपाचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार मा.निरंजनजी डावखरे साहेब यांच्या सुविद्य पत्नी मा.नीलिमाताई डावखरे यांच्याकडे केली असून यावर लवकरात लवकर माणगांवकरांचे व नजीकच्या श्रीवर्धन, म्हसळा,तळा तालुक्यातील पदवीधरांचे कित्येक वर्षांचे स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सौ.डावखरे यांनी सांगितले.

आमदार निरंजनजी डावखरे हे सलग तिसऱ्यांदा या मतदार संघातून प्रचंड बहुमतांनी निवडून आले असून लोकसभा झाल्यानंतर तातडीनेच त्यांनी मतदार संघात असणारे भाजपा महायुतीचे कार्यकर्ते,पदवीधर मतदार,शिक्षक संघटना व समविचारी संस्था संघटना यांना संपर्क करून मतदारसंघातील प्रत्येक विधानसभानिहाय दौऱ्याला सुरवात केली आहे, त्याच निमित्ताने त्या माणगांव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळा येथे आलेल्या असताना झालेल्या बैठकीमध्ये भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवानेते निलेश थोरे यांनी सांगितले कि,माणगांव तालुका हा भविष्यातील रायगड जिल्ह्याचे ठिकाण होणार असून माणगांव शहरामध्ये सद्यस्थितीला लॉ कॉलेज,इडल उहशा,इडल खढ, ईील छींीळपस, उइडउ डलहेश्र,खढख अश्या प्रकारचे विविध विषयांवर पदवी घेण्यासाठी विद्यालये असून तालुक्यातील लोणेरे या गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ असून तेथे दरवर्षी शेकडो विद्यार्थी अभियांत्रिकी पदवी घेत असतात. या सगळ्याच विद्यार्थ्यांनी भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये ज्ञान मिळवावे व चझडउ,णझडउ,खठड, खऋ अश्या अनेक स्पर्धा परीक्षा,शासकीय,बँकिंग परीक्षा उत्तीर्ण व्हाव्यात याकरीता मध्यवर्ती ठिकाण म्हणून माणगांव शहरामध्ये सुसज्ज अभ्यासिका व्हावी जेणेकरून भागातील सर्व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता येईल.यावर बोलताना सौ.नीलिमा डावखरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत सदरच्या अभ्यासिका केंद्र उभारण्यासाठी थेट केंद्रशासनाच्या पातळीवरूनही आपण प्रयत्न करू आणि लवकरात लवकर सदरच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहू असे सांगितले. दरम्यान अश्या प्रकारची अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा



केंद्र झाले तर माणगांव व परिसरातील श्रीवर्धन,म्हसळा, तळा,रोहा, महाड या तालुक्यानाही याचा थेट लाभ होणार असून आपल्या भागातूनही अनेक अधिकारी घडतील असा विश्वास देखील यावेळी व्यक्त करण्यात आला. प्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर,माणगांव ता.अध्यक्ष गोविंद कासार,श्रीवर्धन ता.अध्यक्ष आशुतोष पाटील,युवा मोर्चा ता.अध्यक्ष प्रणय पेडणेकर,सरचिटणीस जहेंद्र मुंढे,बाबुराव चव्हाण, शिक्षक परिषदेचे पदाधिकारी,आश्रमशाळेचे श्री. भगत सर,श्री. काशिनाथ गाणेकर सर,अशोक यादव,समीर धनसे,चिन्मय मोने,अमोल पवार,महेश पाटील,मंदार मढवी व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# धर्मासागर उपासना केंद्र श्रीसिध्देश्वर मित्र मंडळातर्फे भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन

**मुंबई । प्रतिनिधी -** जय जवान क्रिडा मंडळाचे मैदान राम नगर(ब),सुजाता हॉटेलच्या वरील बाजूस,विक्रोळी पार्कसाईट,घाटकोपर(प.)मुंबई या ठिकाणी परमपुज्य गुरुवर्य तपोनिधी बाळासाहेब फणसेबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असलेल्या धर्मासागर उपासना केंद्राच्या नवव्या वर्षपुर्ती निमित्त मार्गशीर्ष कृ.१२/१३/१४ शुक्रवार दि.२७ डिसेंबर २०२४ ते रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ या कालावधीत भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून,पहाटे ५ ते ७ या वेळेत काकड आरती, सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ तद्नंतर रात्रौ ७.३० ते ९.३० हरिकिर्तन असा दैनंदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.दैनंदिन कार्यक्रमांसोबतच तीन दिवसांच्या या कालावधीमध्ये दि.२७ डिसेंबर रोजी शुक्रवारी सकाळी १० वाजता ओम आदिनाथ विश्वेश्वर मंदिर ते कार्यक्रम स्थळ अशा प्रकारे दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.तर दुपारी ३ ते ४ या वेळेत महाधर्मासागर उपासना,सायं.७.३०ते ९.३० या दरम्यान ह.भ.प.कबीर म्हाराज अत्तार( राष्ट्रीय शिवशंभू व्याख्याते,झी टॉकीज मन मंदिरा फेम)यांचे हरिकीर्तन.तर दुसऱ्या दिवशी शनिवार दि.२८डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ आयोजित केला असून सायं ७.३०ते९.३०या वेळेत ह.भ.प.पांडुरंग महाराज उगले(विनोदाचार्य,परभणी)यांचे हरिकीर्तन आयोजित केले आहे.तसेच शेवटच्या दिवशी म्हणजे रविवार दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण आणि दुपारी १२ वाजता गुरुपूजन,सायं ४ ते ५ या वेळेत दिनदर्शिका २०२५ प्रकाशन सोहळा असून,नंतर सायंकाळी ७.३० ते रात्रौ ९.३० यावेळेत ह.भ.प.गुरुवर्य तपोनिधी बाळासाहेब फणसेबाबा (संस्थापक : स्वानंद अध्यात्म ज्ञानपीठ)यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे.अशा विविध प्रकारच्या विशेष कार्यक्रमांचे आयोजन धर्मासागर उपासना केंद्र श्रीसिद्धेश्वर मित्र मंडळातर्फे आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला राजकीय,सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.तरी या कार्यक्रमात जास्तीत जास्त अध्यात्मिक सेवेकऱ्यांनी सहभागी होऊन अध्यात्मिक सेवेचा व ज्ञानाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश भेकरे व उत्सव कमिटी तर्फे करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

# जालनेकरांच्या हित ...

व्यवस्था करण्यात आली असून या साठी शासनाने १०० कोटी रुपये मंजुर केले असून त्यातील ५० कोटी रुपये येत्या दोन-चार दिवसात मिळणार असल्याचे यावेळी आ. खोतकर यांनी सांगितले. महात्मा फुले मार्केटचा प्रश्नावरही श्री खोतकर यांनी येत्या दोन वर्षात हे मार्केट उभारू असे आश्वासन दिली. दर दोन-तीन महिन्यांत अधिकाऱ्यांची बैठक घेत राहू तसेच उपस्थितांनी मांडलेल्या समस्यांवर सकारात्मक परिणाम काढण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी आ. खोतकर यांनी म्हटले आहे.

यावेळी शहर मनपा आयुक्त यांनी कमी कर्मचारी संख्या असल्यामुळे विकास कामांमध्ये काही प्रमाणात अडचणी येत असल्याचे सांगितले. ९५० कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध सादर करण्यात आला असल्याचे सांगतांना आमदार खोतकर यांना राजकीय वजन वापरून हा आकृतीबंधास शक्य तितक्या लवकर मान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी केली. प्रशासकिय कामकाज सुरु आहे. मात्र, लोकनियुक्त बॉडी नसल्यामुळे केंद्राकडून कुठलाही निधी मिळत नाही तसा केंद्राच नियम असल्याचे आयुक्त खांडेकर यांनी सांगितले. शाळा, हॉस्पीटल, रस्ते, स्वच्छता सर्वच बाबींवर काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. यासह आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महानगर पलिकेला जीएसटीचे सहाय्यक अनुदान मिळते. हे अनुदान जालना शहर महानगर पालिकेला मिळावे यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन करत जर जीएसटीचे सहाय्यक अनुदान मिळाल्यास शहराचा विकास झपाट्याने होण्यास मदत मिळेल असेही आयुक्त खांडेकर यांनी सांगितले.

नागरिकांकडूनही अनेक समस्या मांडण्यात आल्यात यात प्रामुख्याने मयुर अग्रवाल यांनी टॅक्स बाबतचा मुद्दा उपस्थित करत अवाजवी टॅक्समुळे जालना सोडण्याची वेळ आली असल्याचे सांगत हा टॅक्स कमी करण्याची मागणी आ. खोतकर- आयुक्त खांडेकर यांच्याकडे केली. यावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन आ. खोतकर यांनी यावेळी दिले.

**मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा- संध्या देठे**

शहरातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावर ठिय्या मांडून बसतात. यामुळे वाहतूकीला अडचण होते. त्यासाठी या जनावरांकरिता कोंडवाडा करावा, अशी मागणी सौ. संध्या देठे यांनी केले. तसेच मनपात हिरकणी कक्ष स्थापन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आज चार ते पाच महिला अधिकारी पालिकेत रूजू झाल्याने महिलांसाठी तो एक मोठा आधार असल्याचे त्या म्हणाल्या. मस्तगड येथील शॉपींग सेंटर मोडकळीस आले आहे तेथे नविन शॉपींग सेंटर सह वाचनालय करण्यात यावे, जुना जालन्यातील स्टेडीयम येथे गैरप्रकार होताहेत. तेथे गाळे बांधून हे गाळे बचत गटांना देण्यात यावे अशी मागणी यावेळी सौ. देठे यांनी केली. मुख्य मार्केटमध्ये करार पद्धतीने सुलभ शौचालयाची सूचनाही सौ. देठे यांनी यावेळी केली.

**ठोस निर्णय घ्यावेत - राजेंद्र राख**

शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. अनेक भागांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून अतिक्रमणांचा विळखा वाढला आहे. शहरातील उद्योगांना विशेषकरून स्टील उद्योगाचा विचार केल्यास त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि महसूल मिळतो, परंतु येथून निघणाऱ्या धुराचे प्रदूषणही गंभीर बाब बनली आहे. या उद्योजकांना यावर उपाययोजना करण्यासाठी कडक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा राजेंद्र राख यांनी व्यक्त केली. आपण उद्योगांच्या विरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शहरातील बायपासचे सर्व्हिस रोड कुठे गेले असा प्रश्नही यावेळी राख यांनी उपस्थित केला. त्या सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण हटवा, ते अतिक्रमण आमचे असो वा तुमचे तेथे कठोर निर्णय घ्या. कार्यकर्ते नाराज होतील होऊ द्या. नविन जालन्यात बगीचा करण्यात यावा अशी मागणी राख यांनी यावेळी केली. तसेच विकासाच्या मुद्द्यावर आपण नेहेमची सोबत राहू मात्र, जेथे चुकले तेथे विरोधक म्हणून जवाब विचारण्याचे काम देखील करणार असल्याचे श्री राख म्हणाले.

**अल्पसंख्यांकासाठी दिलेल्या निधीबद्दल मानले खोतकरांचे आभार- शाह आलम खान**

महानगर पालिका झाल्यानंतर अशी पहिलीच बैठक होत आहे, हे कौतुकास्पद आहे. शहरात पाण्याची समस्या आहे, १७-१८ एमएलडी पाणी येते, १८-१९ टाक्यांमध्ये पाणी भरल्या जाते, आठवडा पाणी देण्यात येते मात्र, पाणी टॅक्स वर्षभराचा घेतल्या जातो, एक दिवस नव्हे किमान तीन दिवस आड पाणी पुरवठा करण्याची मागणी शाह आलम खान यांनी यावेळी केली. अंडरग्राऊंड ड्रेनेज करण्यासह मोती बागेचे सुशोभिकरण करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली तसेच अल्पसंख्यांकासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भरिव निधी दिला त्याबद्दल खोतकरांचे आभार शाह आलम खान यांनी मानले.

**जवाहर बाग खुले करा - विष्णु पाचफुले**

व्यापारी- राजकीय व्यक्ती बसून जालना शहराच्या विकासासाठी चर्चा करण्याची ही पहिलीच वेळ आहे, अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर पलिकेतील सदस्यांना मनपात फायदाच होईल. पाणी पुरवठ्याचे दासवाड रिटायर्ड झाले आहेत. त्यांनी चांगले कार्य केले. त्यांना पुन्हा मनपात काम करण्याची संधी देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. जेणेकरुन पाणी पुरवठ्याचे नियोजन करता येईल. शहरातील जवाहर बाग खुले करण्याची मागणीही श्री पाचफुले यांनी केली.

**वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पाण्याचे स्त्रोत वाढवावे - राजेंद्र जाधव**

जालना शहरातील लोकसंख्या वाढत आहे. आणि वाढत जाणार आहे. पुर्वी केवळ घाणेवाडी जलाशयातून शहराला पाणी पुरवठा होत असे तो पुरेसा होता. कालांतराने जायकवाडी-जालना पाणीपुरवठा प्रकल्प झाला. येत्या चार-पाच वर्षांत आपल्याला पाणी कमी पडेल. त्यामुळे त्याचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक आहे. त्यासाठी सिंदखेड राजा जवळील जवळपास ४०-४५ किलोमिटर अंतरावर असलेल्या खडकपुर्णा प्रकल्पातून पाणी आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे श्री राजेंद्र जाधव यांनी यावेळी सांगितले. पाणी पुरवठ्यासाठी वीज बिलाचा मुद्दा आहे. त्यासासाठी सोलार पॅनल बसविण्याची सुचना यावेळी श्री जाधव यांनी दिली. वीजच्या खांबांवर असलेल्या दिव्यासाठी सोलारची व्यवस्था केल्यास या माध्यमातूनही वीज बिलाच्या माध्यमातून जाणारा पैसा वाचविता येईल. डिपीडीसीचे बजेट वाढविले पाहिजे. दलित वस्तीच्या निधीत वाढ करावी. महात्मा फुले मार्केटचा प्रश्न सोडवावा. मा. कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृहात सुधारणा करण्यात यावी अशी मागणीही श्री जाधव यांनी केली.

**गौतम बुद्ध यांच्या मुर्तीचे काम लवकर करावे - रवी राऊत**

मोती तलावातील गौतम बौद्ध यांच्या मुर्तीच्या कामाचा ठराव झालेला आहे. मात्र, अद्याप कामाला सुरुवात झाली नाही. हे काम लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी रवी राऊत यांनी केली. शहरातील विविध रस्त्यावरील डिवायडरमध्ये विविध प्रकारची झाडे आहेत ते चांगले दिसत नाही. त्यासाठी एकाच चांगल्या प्रकारची झाडे लावून त्याचे सुशोभिकरण करण्यात यावे. पारशी टेकडीचे सुशोभिरकण करण्यासह त्या ठिकाणी हॉटेलला परवानगी दिल्यास त्या ठिकाणची वर्दळ वाढेल असेही राऊत म्हणाले. गोल्डन ज्युबली शाळेजवळील रस्त्यावर आजुबाजूला खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे तेथे नेहेमीच वाहतुक जाम होते. तेथे गट्टू टाकण्यात यावेत. याशिवाय मनपाच्यावतीने शहरात विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या छोटी स्वच्छतागृहात अस्वच्छता असून त्याची स्वच्छता नियमित करण्यात यावी त्या ठिकाणी पाणी उपलब्ध करण्यात यावे, अशी मागणी रवी राऊत यांनी केली.

**मुख्य पाईपलाईनमधून पाणी घेणाऱ्यांवर कारवाई करा- मिर्झा अनवर बेग**

शहरातील विविध भागात चिकन-मटन-चायनिज सेंटर आहेत त्या ठिकाणच्या घाणीमुळे रस्त्यावर कुत्र्यांचा वावर वाढला आहे. ही भटकी कुत्रे लहान मुलांचे लचके तोडत आहेत. चिकन-मटन-चायनिज च्या घाणीची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी व भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी मिर्झा अनवर बेग यांनी केली. गरिबांचे अतिक्रमण काढता मोठ्या लोकांच्या अतिक्रमणे काढण्याची आवाहन करतांना त्यांनी मुख्य पाईप लाईनमधून पावरफुल लोकांनी कनेक्शन घेतले आहेत. ते कनेक्शन तात्काळ बंद करण्याची सूचनाही मिर्झा अनवर बेग यांनी केली.

# फळबाग पिक ...

कंपनीला सुचना देवून पिकविमा शेतकयांना तात्काळ देण्याची मागणी केली तसेच जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेच्या साडेतिन लाख ठेवीदारांच्या ठेवी असुन यामध्ये शेतकरा, कामगार व सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या ठेवी असुन त्या ठेवी संबधीत ठेवीदारास तात्काळ अदा करण्यात येवुन बँकेच्या दोषी संचालक वर तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी आ.नारायण कुचे यांची विधानसभेत राज्यशासनाकडे केली आहे.

# मराठवाडा, विदर्भाच्या विकासासाठी पायलट प्रोजेक्ट राबवा-आ. राजेश राठोड

**मंठा । प्रतिनिधी -** मराठवाडा आणि विदर्भाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी पायलट प्रोजेक्ट राबवावा, अशी मागणी आमदार राजेश राठोड यांनी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात केली आहे.



मराठवाड्याचा अनुशेष दुर करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे एक महिन्याचे अधिवेशन बोलवावे अशी सूचनाही आ. राठोड यांनी यावेळी मांडली. राज्यपालांच्या भाषणात मराठवाडा आणि विदर्भाच्या विकासासाठी कोणतेही पॅकेज जाहीर न केल्याबद्दल खेद व्यक्त करतांनाच मराठवाड्यामध्ये सिंचन, आरोग्य, शिक्षण, रस्ते विकास व रोजगाराचा अनुशेष बाकी असल्यामुळे विशेषतः मराठवाडा महाराष्ट्राच्या तुलनेत विकासापासून कोसो दूर असल्याने मराठवाड्याला महाराष्ट्राच्या बरोबरीत आणण्यासाठी राज्यपाल आपल्या भाषणात मराठवाड्याच्या विकासासाठी ५ हजार कोटींचे विशेष पॅकेज जाहीर करतील अशी अपेक्षा होती. मात्र, त्यांनी अशी कोणतीही घोषणा केली नाही. त्यासाठी मराठवाड्यात एक विशेष अधिवेशन घेऊन मराठवाड्याचा अनुशेष दूर करावा, अशी अपेक्षा आ. राजेश राठोड यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज आणि इंदू मिल येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक तातडीने उभारावे अशी मागणीही त्यांनी केली. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला आदिवासी संवर्गात घेऊन या समाजाच्या रोजगार, उद्योग, व्यापार, कृषी, पशुपालन याकरिता एक लाख कोटींचे पॅकेज देऊन समाजातील घटकांना न्याय द्यावा, अशी मागणी करीत आ. राजेश राठोड यांनी मराठवाडा विदर्भाच्या विविध प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधले.

# मोहन इंगळे यांना उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** ग्राहकांच्या हितार्थ उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जालना येथील जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष मोहन इंगळे यांना या वर्षीचा कै.अरुण भार्गव पुरस्कृत राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



जालना येथील सनराईज राजस्थानी हॉटेलचे संचालक तथा जालना जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष मोहन इंगळे यांनी ग्राहक पंचायत व जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून ग्राहकांना न्याय देण्यासाठी मागील कालावधीत अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले आहेत. ग्राहकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने आयोजित जिल्हा ग्राहक पंचायतच्या बैठकीत इंगळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधन्याचा प्रयत्न वेळोवेळी केलेला आहे. ग्राहक हितासाठी केलेले प्रयत्न आणि राबवलेले उपक्रम या कार्याची दखल घेऊन ग्राहकतिर्थ बिंदुमाधव जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ या वर्षासाठी दिल्या जाणाऱ्या कै. अरुण भार्गव पुरस्कृत राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार जालना जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष मोहन इंगळे यांना जाहीर करण्यात आला आहे. या शिवाय राज्यातून सुधाकर भदरगे कोल्हापूर, श्रीराम सातपुते नागपूर, संदेश सावंत रत्नागिरी, गजेंद्र क्षीरसागर अहिल्यानगर यांनाही सदर पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून आगामी जानेवारी महिन्यात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्राहक पंचायतचे अध्यक्ष विजय लाड, राज्य सचिव अरुण वाघमारे यांच्यासह जिल्हा ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष दिलीप लाड, संघटक संजय देशपांडे, सचिव अनंत वाघमारे, शंकरराव सवादे, श्रीमती शालिनी पुराणिक, सौ. सुचिता सेवलीकर, अहेमद नुर, सौरभ पंच यांनी मोहन इंगळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी थेट रोख रक्कम हस्तांतरित

## उर्वरित लाभार्थ्यांनी तहसील कार्यालय कागदपत्र जमा करावेत - नायब तहसीलदार राजपूत

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील एपीएल केशरी शिधापत्रिकाधारक १४४७ शेतकरी लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती १५० रुपये या दराने रोख रक्कम हस्तांतरित करण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांनी कागदपत्र तहसील कार्यालयात जमा करावेत असे आवाहन नायब तहसीलदार श्री राजपूत यांनी केले आहे. ही योजना शासनाने २८ फेब्रुवारी २०२३ पासून सुरु करण्यात आली असून सदर योजने अंतर्गत मंठा तहसिल कार्यालयांतर्गत एकून एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थी २४३६ आहेत त्यापैकी १४४७ लाभार्थ्यांना १५० रु प्रति व्यक्ती या दराने रोख रक्कम हस्तांतरण करण्यात आली आहे. मंठा तहसिल अंतर्गत असलेल्या रास्तभाव दुकानातील ९८९ लाभार्थी रोख रक्कम हस्तांतरणापासून बाकी आहेत. तहसिल प्रशासनाच्या वतीने तहसिलदार श्रीमती सोनाली जोंधळे व पुरवठा नायब तहसीलदार श्री राजपूत यांनी बाकी असलेल्या लाभार्थ्यांना तहसिल कार्यालयात सदर योजनेसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे जमा करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.



# नवीन अभ्यासक्रमानुसार ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा

**जालना -** सन २०२५ पासून ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेच्या नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहे. यावर्षी पासून जानेवारी- २०२५ ते जुन-२०२५ या सहा महिन्याचा ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग आहे. या वर्गात प्रवेश घेण्यासाठी बारावी पास ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र, जातीचा दाखला, टी.सी.,आधार कार्ड या कागदपत्रांची आवश्यकता आहे. यामध्ये ग्रंथालय आणि समाज, ग्रंथालय व्यवस्थापन, वर्गीकरण व तालिकीकरण (तात्विक), वर्गीकरण व तालिकीकरण (प्रात्याक्षिक), माहिती साधने आणि सेवा,ग्रंथालय तंत्रज्ञान,कार्यानुभव व प्रकल्प या विषयांचा समावेश आहे. ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालये, आश्रमशाळा, न्यायालये, आरोग्य विभाग यासह अन्य विविध शासकीय कार्यालयांमध्ये सहायक ग्रंथपाल, ग्रंथालय परीचर या पदांवर नौकरीची संधी मिळते. यासाठी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय, जालना येथे संपर्क साधण्याचे आवाहन ग्रंथपालन वर्गाचे वर्गव्यवस्थापक प्रवीण देशपांडे यांनी केले आहे.

# जालना समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना अभिवादन




**जालना । प्रतिनिधी -** कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वच्छतेचे महामेरू राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना त्यांच्या स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. या वेळी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. दिपक बुक्तरे,प्रशासकीय अधीकारी रमेश गजर, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. सुधीर गायकवाड, डॉ. मधू खोब्रागडे, डॉ. मीना बोर्डे, डॉ. रेणुका बडवणे, जगन्नाथ मालवार, प्रकाश दांडगे, अनिल हजारें, किशोर ढेकळे,विष्णु भोसले, राधाकृष्ण देशमुख, शिवाजी भुतेकर,शुभांगी भुतेकर, वैष्णवी भुतेकर आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय गणित दिवस विशेष

# द मॅन हू न्यू इन्फिनिटी

भारताने गणित विषय व तंत्रज्ञान साठी नेहमीच योगदान दिले आहे. भारतात अनेक विद्वान होऊन गेले ज्यांच्या कार्याला जगभर ख्याती भेटली.असेच एक महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची आज जयंती.

श्रीनिवास अयंगर रामानुजन यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ इरोड (तेव्हा मद्रास) तामिळनाडू येथे झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीनिवास अयंगर व आईचे नाव कोमलताम्मल होते. रामानुजन यांचे वडील एक दुकानात हिशोबनीस तर आई गृहिणी होती. रामानुजन चे प्राथमिक शिक्षण कुंभकोणम गावात झाले. यांनतर तात्यांनी तामिळ माध्यम शाळेत प्रवेश घेतला. ते सुरवाती पासून अभ्यासात हुशार होते. दहावीच्या परीक्षेत ते जिल्ह्यांमधून प्रथम आल्या मुळे त्यांना शिष्यवृत्ती देखील भेटली. ह्याच काळात त्यांचा कल गणित विषयाकडे जास्त वाढला. त्यांना त्रिकोणमिती चे पुस्तक भेट म्हणून भेटले होते. गणिताची आवड असल्यामुळे त्यांनी इतर विषयांकडे दुर्लक्ष केले परिणाम स्वरूप बारावीच्या परीक्षेत ते नापास झाले. त्यामुळे त्यांना भेटणारी शिष्यवृत्ती हि बंद करण्यात आली.




रामानुजन यांची आर्थिक परिस्तिथी बरी नव्हती. त्यामुळे पुढचे शिक्षण व रोजगार सारखे प्रश्न समोर होते. त्यांनी नंतर ट्युशन घेण्यास सुरवात केली. परंतु ते सर्वांना स्वतः सारखं हुशार समजून शिकवत होते. ह्या कारणामुळे नंतर शिकवणी सुद्धा बंद करावी लागली. १९०९ साली रामानुजन यांचे लग्न जानकी सोबत झाले. त्यानंतर ते मद्रास येथे नोकरी करायला गेले. परंतु १२ वि उत्तीर्ण नसल्यामुळे तात्यांना नोकरी भेटत नव्हती. ह्याच काळात त्यांची भेट डिप्टी कलेक्टर श्री वी. रामास्वामी अय्यर यांच्यासोबत झाली. गणित विषयाचे ते विद्वान होते. ते रामानुजन यांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित झाले व दार महा २५ रु भत्ता मंजूर केला. मद्रासला राहूनच रामानुजन यांनी पहिले शोधपत्र जर्नल ऑफ इंडियन मैथेमेटिकल सोसाइटी मध्ये प्रकशित केले. त्यांनी १९१२ मध्ये प्रोफेसर हार्डी यांना पत्र लिहून त्यांनी शोधकार्य व प्रमेय यांची माहिती पाठवली. प्रोफेसर हार्डी यांना रामानुजन यांच्या शोधकार्य मुळे प्रोफेसर हार्डी थक्क झाले. त्यांनी ती प्रमेय आपल्या सहकाऱ्यांना दाखवली व रामानुजन यांना त्यांच्या सोबत शोधकार्य करण्यासाठी बोलवले. रामानुजन परदेशात जायला तयार नव्हते. रामानुजन शेवटी निर्णय घेऊन रामानुजन परदेशात गेले. रामानुजन यांना अश्वेत भारतीय असल्यामुळे वर्णभेदला सामोरे जावे लागले. रामानुजन केम्ब्रिज येथे ट्रिनिटी कॉलेज मध्ये प्रोफेसर हार्डी यांच्या सोबत शोधकार्य करू लागले. प्रोफेसर हार्डी त्यांची प्रमेयची वही पाहून थक्क झाले.त्यांच्या शोधकार्याच्या आधारावर त्यांना बी.ए. ची पदवी देण्यात आली.

ते पूर्णतः शाकाहारी होते. म्हणून त्यांना जेवण स्वतः तयार करावे लागत असे. त्या काळात विश्व युद्ध सुरू झाले. तान्दुळ चा होणार पुरवठा बंद झाला. त्याना जेवण करण्यासाठी भाज्या सुद्धा भेटत नव्हत्या. उपाशी राहणे , खूप जास्त थंडी मुळे त्यांची तब्येत खराब होत चालली होती. त्यांना टी.बी. रोगाची लागण झाली होती. त्यांची प्रतिभा पाहून त्यांना रॉयल सोसायटी चे फेलो निवडण्यात आले. ते सर्वात लहान वयात फेलोशिप घेणारे व्यक्ती होते. ट्रिनिटी कॉलेज मध्ये फेलोशिप घेणार ते पहिले भारतीय होते. त्यांना कैम्ब्रिज फिलोसॉफिक सोसायटी चे फेलोशिप हि भेटली.

त्यांच्या आजारपणामुळे डॉक्टरांनी त्यांना भारतात राहण्याचा सल्ला दिला. ते भारतात परत आले. परंतु प्रकृती काही साथ देत नव्हती.

भारतात आल्याच्या २ वर्षानंतर २६ अप्रिल १९२० ला त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे निधन पूर्ण रॉयल ससायटी व ट्रिनिटी कॉलेज ला हादरवून टाकणारी होती. त्यांचा निधनाने प्रोफेसर हार्डी खूप दुखी झाले व त्यांच्या जीवनावर हि ह्याचा परिणाम झाला.

रामानुजन ह्यांनी एकूण ३५०० प्रमेय जगाला दिली. त्यापैकी बऱ्याच प्रमेय व संशोधन चालू आहे. १७२९ ह्या अंकाला हार्डी रामानुजन नंबर म्हणून ओळखतात. मौक थिटा फंक्शन, रामानुजन प्राईम , रामानुजनऋस सम हे त्यांच्या संशोधन पैकी काही प्रसिद्ध संशोधन. त्यांच्या जयंती निम्मित भारत सरकारने २२ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणून घोषित केला आहे. तसेच रामानुजन यांना सन्मान म्हणून पोस्ट स्टॅम्प सुद्धा प्रकशित केले आहे. हॉलिवूड ने हि श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावर आधारित चित्रपट प्रकशित केले आहे, त्या चित्रपटाचे नाव आहे 'द मॅन हू न्यू इन्फिनिटी' (The Man who knew Infinity ). जगातील ह्या महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांना विनम्र अभिवादन

# हॉलिवूड निर्माता रेन मोरे, गायक उदित नारायण यांच्या उपस्थितीत लाइफआर्ट कुंभमेळा २०२५ ची अधिकृत घोषणा

## हॉलिवूड, बॉलीवूड पहिल्यांदाच एकत्र येत या अनोख्या संकल्पनेसाठी १२ एकर जागेत भाविकांसाठी विशेष सुविधा

कुंभमेळा २०२५ पुढील वर्षी १३ जानेवारीपासून सुरू होईल आणि २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत चालेल. मात्र यावेळी त्यात नवा इतिहास रचला जाणार आहे. पहिल्यांदाच हा कुंभमेळा हॉलिवूड, बॉलीवूड आणि अध्यात्म यांचा अद्भुत संगम असणार आहे. सुप्रसिद्ध हॉलिवूड निर्माता आणि संयोजक रण मोरे गेल्या ३० वर्षांपासून भारतात खूप काही करत आहेत. हॉलिवूड निर्माता रेन मोरे आणि ऋअखउए चे अध्यक्ष इछ तिवारी यांनी महाकुंभ २०२५ मध्ये लाइफआर्ट व्हिलेज ची घोषणा केली आहे. या लाइफ आर्ट व्हिलेजबद्दल अधिक माहिती तुम्ही ु.श्रळषशरीीं.ळप वर मिळवू शकता. या वेबसाईटवरून बुकिंग करता येईल.

या अधिकृत घोषणेसाठी मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेला हॉलिवूडचे निर्माते रेन मोरे, फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (एफडब्ल्यूआयसीई) चे अध्यक्ष बीएन तिवारी, विशेष पाहुणे उदित नारायण, दीपक पराशर, अशोक पंडित, सोमा घोष, गंगेश्वर उपस्थित होते लाल श्रीवास्तव (संजू), सुंदरी ठाकूर, मुकेश मोदी आदी उपस्थित होते. सर्वप्रथम तबलावादक झाकीर हुसेन यांच्या आत्म्याला शांती मिळावी यासाठी येथे मौन पाळण्यात आले.

कुंभमेळ्यातील क्षणचित्रांसह हॉलिवूड चित्रपट निर्माता रण मोरे यांच्या कार्याची झलक ऑडिओ व्हिडिओच्या स्वरूपात दाखवण्यात आली. रेन मोर म्हणाले की, कोरोनाच्या काळात काहीतरी वेगळे आणि मोठे करण्याचा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यानंतर लाइफ आर्ट कुंभमेळा २०२५ ची कल्पना त्यांच्या मनात आली. यापूर्वी असे कधीच घडले नव्हते जे या जत्रेत घडणार आहे. अध्यात्म आणि सर्जनशीलता यांचा अद्भुत मिलाफ येथे पाहायला मिळेल आणि यासाठी मी बीएन तिवारी यांच्या सहकार्याचे खूप कौतुक करतो.

यावेळी सोमा घोष यांनी भक्तिगीते गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. ते म्हणाले की आपण कुंभमेळ्याला जातो त्यामुळे आपल्याला ऊर्जा मिळते. १२ वर्षांनंतर आपल्या सर्वांना हे अमृत घेण्याची संधी मिळते. इतकी चांगली संकल्पना मांडल्याबद्दल आणि लाइफ आर्ट आयोजित केल्याबद्दल बीएन तिवारीजींचे आभार. उदित नारायण यांनीही आपल्या गायनाने येथील भक्ती आणि देशभक्तीची भावना जागृत केली. ते म्हणाले की कुंभमेळा दर १२ वर्षांनी एकदा साजरा केला जातो, यावेळी पुढील वर्षी २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणावर साजरा केला जाणार आहे. आपला भारत किती सुंदर देश आहे, तिथली संस्कृती, चालीरीती, परंपरा, वारसा सर्वच अप्रतिम आहे. चित्रपटसृष्टी आणि कलाकारांना सरकारकडून खूप सहकार्य मिळत आहे. लाइफ आर्टला कुंभमेळ्यासाठी सेक्टर १० मध्ये १२ एकर जागा मिळाली असून, त्यात भाविकांसाठी अनेक सुविधा असणार आहेत.

अशोक पंडित म्हणाले की, उदित नारायण यांचा आवाज हा भारताचा वारसा आहे. त्यांच्या गळ्यातील गोडवा ऐकायला जग उभे राहते. लाखो कोटी लोक कुंभमेळ्याला जातात. फेडरेशन लाइफ आर्टमध्ये सामील झाले कारण उद्योगातील अनेकांना कुंभमेळ्यात जायचे होते, आम्हाला फोन येत होते की उद्योगातील लोकांसाठी काही विशेष सुविधा असतील की नाही. या कलेतून सर्व सोयीसुविधा असतील. हे गाव तिथे पंचतारांकित सुविधांनी बांधले जात आहे. यासोबतच योगा, वेलनेस, मेडिटेशन, होलिस्टिक वर्कशॉप, फेस्टिव्हल येथे होणार आहे. रोज आरती होईल. दीपक पराशर यांनी त्यांचे जवळचे मित्र झाकीर हुसेन यांनाही येथे आदरांजली वाहिली आणि सांगितले की, १२ वर्षांपूर्वी मी तीन नद्यांचा महान संगम असलेल्या कुंभमेळ्याला गेलो होतो. तिथला अनुभव संस्मरणीय होता. लाइफ आर्ट कुंभमेळा २०२५ साठी तुम्हा सर्वांना हार्दिक शुभेच्छा. महासंघाशी निगडित अशोक दुबे म्हणाले की, महासंघ जीवन कलासोबत आहे. कुंभमेळ्यात ३०० खोल्या बांधल्या जात आहेत, अनेक कामगार तिथे काम करत आहेत. सोयीमुळे गंगेत स्नान करण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी जावे लागणार नाही. ध्यानासाठीही एक खास जागा आहे.

महासंघाचे अध्यक्ष बीएन तिवारी म्हणाले की, कुंभमेळ्यात स्नान करताना तुमची सर्व कामे होतील. येथे योगासनेही शिकवली जाणार असून, सुमारे दीड महिन्याच्या कुंभमेळ्यासाठी आव्हान आखाडाही मदत करत आहे. लाइफ आर्टच्या समर्थनार्थ त्यांचे हजारो लाखो संत उभे आहेत. मोक्ष व्यतिरिक्त, तेथे बरेच काही पाहण्यासारखे आहे. अनेक वेळा उदित नारायण, अनूप जलोटा, सोमा घोष यांना कुंभमेळ्यात बोलावले जाईल. कुंभमेळा २०२५ च्या लाइफआर्ट व्हिलेज मध्ये संगीत महोत्सव आणि चित्रपट महोत्सव देखील दररोज आयोजित केला जाईल. तसेच, लोकांना आध्यात्मिक शांती आणि शांतता प्रदान करण्याचे काम केले जाईल. यासोबतच निर्माता रेन मोरे यांनी या निमित्ताने हॉलिवूड दिग्दर्शक दिग्दर्शित 'द कुंभ' चित्रपटाची घोषणा केली.



# परतुर येथील मंजूर उपजिल्हा रुग्णालयाची ६० कोटींची प्रशासकीय मान्यता प्रदान करा

## आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

**नागपूर -** माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत परतुर व मंठा या दोन्ही तालुक्यांमध्ये उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. परतुर व मंठा हे दोन्ही शहरे शेगाव- पंढरपूर व छत्रपती संभाजीनगर - नांदेड या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडलेले आहेत तर मुंबई - नांदेड या ब्रॉडगेज रेल्वे मार्ग देखील परतुर या शहरातून जातो. त्यामुळे या ठिकाणी अपघातांचे प्रमाण जास्त आहे. परतुर - मंठा या दोन्ही तालुक्यातील गावे जालना या जिल्ह्याच्या ठिकाणापासून जवळपास ७५-१०० किलोमीटर पेक्षा अधिक अंतरावर आहे त्यामुळे रुग्णांना सेवा देण्यासाठी मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्याची मागणी वारंवार आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने करण्यात आले होती.



नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनादरम्यान औचित्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार बबनराव लोणीकर विधानसभेत म्हणाले की, दि.२४ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे परतूर येथील उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी देण्यात आली असून परतुर येथे १०० खाटांचे भव्य उपजिल्हा रुग्णालय प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने उभारले जाणार आहेत त्यासाठी अंदाजे ६० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित असून या ६० कोटी रु ची प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात यावी.

यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, दि. २६ जुलै २०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे मंठा येथे उपजिल्हा रुग्णालयाची प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने यासाठी ४९.७० कोटी रु. च्या महिला प्रशासकीय मान्यता मिळाली असून मंठा येथे ५० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात येणार आहे. या उपजिल्हा रुग्णालयाच्या उभारणीमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना जलद गतीने आरोग्यसेवा मिळावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत असे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

परतुर उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थानासाठी ६० कोटी रुपयाची प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर करणे तसेच मंठा येथील उपजिल्हा रुग्णालयाची प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने यासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेले ४९.७० कोटी रुपये निधी तात्काळ वर्ग करण्यात यावा. यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी आज अधिवेशनादरम्यान मुद्दा उपस्थित केला आहे.

केंद्र सरकारच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मे २०२४ मध्ये परतुर तालुक्यातील आष्टी व वाटुर आणि मंठा तालुक्यातील ढोकसाळ व दहिफळ खंदारे या ४ ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रत्येकी ०१ कोटी ४३ लक्ष रुपयांची मंजुरी मिळालेली आहे. परंतु या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने यासाठी प्रत्येकी १० कोटी रुपयांची आवश्यकता आहे त्यानुसार वरील चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थानंकरिता प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यासह निधी वितरीत करण्यात यावा. अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात केली

# परभणीतल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरी संघटनांकडून जालना बंद

## बंदला व्यापाऱ्यांचा प्रतिसाद,पोलीसांचा तगडा बंदोबस्त

**जालना । प्रतिनिधी -** परभणी येथील संविधान विटंबन आणि न्यायलयीन कोठडी मध्ये सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू घटनेच्या पार्श्वभूमिवर आंबेडकरी संघटनांकडून आज दि. २१ शनिवार रोजी सकाळी अकरा वा. दरम्यान जालना बंदची हाक देण्यात आलीये.. परभणीमध्ये संविधानाच्या प्रतिकृतीची नासधूस करण्यात आली होती. त्यानंतर परभणी शहरात तणावाचं वातावरण निर्मीण झालं होत. त्याचबरोबर सोमनाथ सुर्यवंशी या आंदोलकाचा मृत्यू झाला होता. त्यामुळं या घटनेच्या निषेधार्थ आज जालना बंदचं आवाहन करण्यात आलं असून व्यापार्यांनीही बंदला पाठिंबा दिलाय.. दरम्यान अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी म्हणून पोलिसांचाही तगडा बंदोबस्त लावण्यात आलाय..



दरम्यान जालना शहरातील मामा चौक येथून शांतता रली काढण्यात आली.सिंधी बाजार,फुल बाजार,सराफा मार्केट,पानीबेस,सुभाषचंद्र बोस रोड मार्गे मस्तगड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडक यांच्या पुतळ्यास अभिवादन करून गांधी चमन, शनिमंदिर,ऊड्डाण पुल,नूतनवसाहत येथून अंबड चौफुली येथे दीड वाजेच्या सुमारास रलीचा समारोप झाला.

यावेळी आंबेडकरी समाजासह ईतर समाजातील व संघटनातील नागरीकांची मोठ्या संख्येने ऊपस्थिती होती. रली दरम्यान आंदोलकांच्या वतीने परभणी पोलीसांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मयत सोमनाथ सुर्यवंशी यांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली.

# शहरातील नूतन वसाहत येथे लहान लेकरांसह महीलांनी केला अमित शहांचा निषेध

## रस्त्यावर बसून अमित शहांविरोधात जोरदार घोषणाबाजी

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात महीलांनी लहान-लहान लेकरांना सोबत घेऊन रस्त्यावर बसत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा निषेध केलाय.. अमित शहा यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी संसदेमध्ये वादग्रस्त वक्तव्य केलं होतं.. त्याचे पडसाद देशभरात ऊमटत असून विरोधी पक्षांसह वेगवेगळ्या संघटनांनी निषेध केला. जालन्यात नूतन वसाहत भागात महीलांनी एकत्र येत लहान लेकरांसह अमित शहांविरोधात घोषणाबाजी करत निषेध केला आहे. बाबासाहेबांनी देशभरातल्या महीलांना स्वर्ग दाखवला असून देशाच्या पटलावर अमित शाह आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे काहीच योगदान नसून या वक्तव्यावरून अमित शाह यांनी माफी मागीतली पाहिजे अशी मागणी आंदोलक महीलांनी केली आहे.



युवा आदर्श

### शिक्षक ...

सर्व व्यापी शिक्षक
कामे जमतात सारी
पडेल ते सगळे करा
नाही बोलायचे सॉरी
मोजावी खानेसुमारी
हिंडत रहा घरोघरी
लसीकरण केले का
पहात रहा दारो दारी
बडदास्त ठेवा मस्त
येता शिक्षणाधिकारी
सज्ज रहा सेवेसाठी
चहा बिस्कुटे न् खारी
वृक्षारोपण यंदा मोठे
हातात शोभते झारी
इलेक्शन ड्युटी वरी
मधेच निघाली स्वारी
कुटूंबनियोजन किती
मोजायची हागणदारी
कोण जाणे सांगतीलं
करावी वसुल उधारी
सकाळी बनव न्याहरी
खिचडी पकवा दुपारी
म्हणू नका नाचा रात्री
घेऊन झकास सुपारी
मुले शिकती आपसूक
ती स्वावलंबी बिचारी
का वाढे नापास प्रमाण
रे शिक्षका प्रश्न विचारी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.